पुणे जिल्हा परिषद,पुणे
स्व.यशवंतराव चव्हाण भवन
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग ,कॅम्प पुणे 01
जा.क्र.जिप/पंचा/5-7/ 101 /2021
पुणेदिनांक: 08 / 01/2021

प्रति,
मे.मेरिडियन डेव्हलपर्स
तर्फे श्री.रविंद्र लक्ष्मण धुमाळ व इतर तीन
रा.कदमवाकवस्ती ता. हवेली जि.पुणे

**विषय:-** ग्रामपंचायत ग्रामपंचायत कदमवाकवस्ती येथील गट नं.257 मधील क्षेत्र 2100.00 चौ.मी. या जागेवरील नियोजित निवासी इमारतीच्या समूह गृह बांधकामास **देणत आलेल्या विविध मंजुरींच्या विधीग्राहयतेबाबत**

**संदर्भ-** मे.मेरिडियन डेव्हलपर्स तर्फे श्री.रविंद्र लक्ष्मण धुमाळ व इतर तीन रा.कदमवाकवस्ती ता. हवेली जि.पुणे यांचा दि.04/01/2021

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविणेत येते की ,महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दि.29 डिसेंबर 2014 आणि शासन निर्णय क्र.व्हीपीएम 2015/ प्र.क्र.39/ पं.रा.4 दि.11 डिसेंबर 2015 च्या राजपत्रात व शासन निर्णयात नमुद केलेप्रमाणे ज्या गावांकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 यांच्या ( **पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातील मौजे लोणीकाळभोर व कदमवाकवस्ती करता नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिनीएस/1875/1602/W-ii(B)/नवि-5 दि.13/03/1975 अन्वये बिगर नगर परिषद क्षेत्रासाठीची विकास योजना तयार करणेत आलेली आहे.)** तरतुदीन्वये प्रारुप प्रादेशिक योजना किंवा अंतिम प्रादेशिक योजना प्रसिध्द करणेत आली आहेअशा हवेली तालुक्यातील **लोणीकाळभोर व कदमवाकवस्ती** या गावाच्या क्षेत्राचे **नियोजन प्राधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.पुणे** हे असल्यामुळे त्यांची बांधकामांना पुर्वपरवानगी आवश्यक आहे.

सदर बांधकामांचे आराखडयांना जिल्हा परिषद स्तरावर पदस्थापित नगररचना अधिका-याची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु जिल्हा स्तरावर आजरोजी नगररचना अधिकारी यांचे पद पदस्थापित नसलेमुळे बांधकाम आराखडे जिल्हा परिषदेकडे नगररचना अधिकारी यांचे मंजुरीसाठी सादर केले आहेत.परंतु जिल्हा परिषद,पुणे येथे देखील **नगररचना अधिकारी हे पद आजतारखेपर्यंत पदस्थापित झालेले नसलेने आपल्या कार्यालयाकडून तांत्रिक अभिप्राय उपलब्ध करुन घेणेत येतात.नगर रचना विभागाने दिलेल्या तांत्रिक अभिप्राया वर म्हणजेच रेखांकन,नकाशे यावर त्या विभागाचे सही शिक्के असतात.त्यामुळे या विभागाकडून परत त्यावर कोणताही स्वरुपाचा प्रमाणित करणेचा शिक्का वा स्वाक्षरी केलेली जात नाही.सबब नगर रचना यांच्या सही व स्वाक्षरीचे रेखांकन वा नकाशे हे पुर्णत: विधीग्राहय आहेत.**

सबब उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने विकास योजना,लोणीकाळभोर/कदमवाकवस्ती करिता नियोजन प्राधिकरण म्हणून जिल्हा परिषद पुणे ,असलेने बांधकाम परवानगी/विकास परवानगी जिल्हा परिषद ,पुणे यांनी देणे अपेक्षित असलेने प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करणेत आलेले होते.

अ) गट नं.257 मधील 2100 चौ.मी. जागेवरील बांधकामासंदर्भात झालेली कार्यवाही पुढील प्रमाणे :-

1.पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण,पुणे यांचेकडील विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र क्र.पीएच/मौ.कदमवाकवस्ती/ग.नं.257 पै./1964 दि.02/11/2015 अन्वये बांधकाम नकाशांना मंजुरीसाठी शिफारस करणेत आलेली आहे.सदर बांधकाम परवानगीनुसार पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इमारत | मंजुरीप्रमाणे | मजला | सदनिका क्र. | एकुण सदनिका |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **"ए" विंग पी + 7 मजले** | पी + 7 मजले | **स्टील मजला** | **पार्किंग** | --- |
| | | | **पहिला मजला** | 101 ते 104 | 4 |
| | | | **दुसरा मजला** | 201 ते 204 | 4 |
| | | | **तिसरा मजला** | 301 ते 304 | 4 |
| | | | **चौथा मजला** | 401 ते 404 | 4 |
| | | | **पाचवा मजला** | 501 ते 504 | 4 |
| | | | **सहावा मजला** | 601 ते 604 | 4 |
| | | | **सातवा मजला** | 701 ते 704 | 4 |
| | | | | एकुण सदनिका - | 28 |
| 2 | **"बी" विंग पी + 7 मजले** | पी + 7 मजले | **स्टील मजला** | **पार्किंग** | --- |
| | | | **पहिला मजला** | 101 ते 104 | 4 |
| | | | **दुसरा मजला** | 201 ते 204 | 4 |
| | | | **तिसरा मजला** | 301 ते 304 | 4 |
| | | | **चौथा मजला** | 401 ते 404 | 4 |
| | | | **पाचवा मजला** | 501 ते 504 | 4 |
| | | | **सहावा मजला** | 601 ते 604 | 4 |
| | | | **सातवा मजला** | 701 ते 704 | 4 |
| | | | | एकुण सदनिका - | 28 |

2.मा.जिल्हाधिकारी,पुणे (महसूल शाखा) यांचेकडील आदेश क्र.पमह/PMRDA/SR/ 82/15 दि.11/3/16 अन्वये बिनशेती वापरास व रहिवास बांधकामा आराखडयास मंजूरी प्रदान केलेली आहे.

3.पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण,पुणे यांचेकडील पत्र क्र.DP/बीएच/कदमवाक वस्ती/ग.नं.257/प्र.क्र.140/15-16 दि.22/8/2016 अन्वये **जोते तपासणी प्रमाणत्र दिलेले आहे.**

4.पुणे महानगरपालिका ,अग्नशिमन विभागाने पत्र क्र.2676 दि.4/10/2018 व पत्र क्र. 4964 दि.12/2/19 अन्वये अर्जदारास नकाशावरील शिफारसींसह **अग्निशमन दाखला दिलेला आहे.**

5.मे.मेरिडीयन डेव्हलपर्स तर्फे रविंद्र लक्ष्मण धुमाळ व इतर तीन जण यांचा दि.4/07/2018 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला होता.

6. या कार्यालयाकडील पत्र क्र.जिप/पंचा/5-7/185/18 दि.01/08/2018 अन्वये सदरील प्रस्ताव सहायक नगर रचना विभागाकडे पाठविणेत आलेला होता.

7.सहायक संचालक नगर रचना,पुणे यांचेकडील पत्र क्र.कदमवाकवस्ती/ता.हवेली/ग.नं.257/455 दि.16/03/2019 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र मंजूर करणेबाबत शिफारस करणेत आलेली होती.

8.त्यानुसार इकडील भोगवटा प्रमाणपत्र (पुर्णत्वाचे प्रमाणपत्र ) आदेश क्र. जिप/पंचा/5-7/83/2019 दि.27/03/2019 अन्वये देणेत आलेले आहे.

मौजे कदमवाकवस्ती व लोणीकाळभोर या कार्यक्षेत्रातील विकास आराखड्यानुसार बांधकाम परवानगी , रेखांकन व नकाशे मंजूरी ,जोते तपासणी , पुर्णत्वाचे प्रमाणपत्र देणेचा पुर्ण अधिकार नगर रचना विभाग ,महाराष्ट्र शासन या विभागाकडील शासन निर्णय क्र.टिपीएस-1819 /व्हीआपी/205/प्र.क्र.148/19/नवि-13 दि.11/09/2019 पर्यंत पुणे जिल्हा परिषदेला होता. तसेच कदमवाकवस्ती व लोणीकाळभोर कार्यक्षेत्रातील बांधकाम परवानगी दिलेल्या सर्व परवानग्यांना मा.सर्वसाधारण सभा दि.06/12/2019 विषय क्र.408 ठराव क्र.651 अन्वये बांधकाम परवानगी नोंदवहीतील नोंदीस मान्यता घेणेत आलेली आहे.त्याप्रमाणे नगर विकास विभाग , मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.टिपीएस-1819/व्हीआयपी/205/प्र.क्र.148/19/नवि-13 दि.11/09/2019 चे निर्णयानुसार पुर्ण जिल्हा परिषदेस असलेले या दोन (लोणीकाळभारे / कदमवाकवस्ती ) गावांसंदर्भातील सर्व नियोजन प्राधिकारी चे अधिकार हे पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकारण , पुणे यांचेकडे वर्ग झालेले आहेत.

यास्तव उपरोक्त विषयांकित बांधकामाबाबत या कार्यालयाकडून झालेले सर्व कामकाज (क्र.1 ते 8) हे नियमानुसार व विधीग्राहय आहे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)**
**पुणे जिल्हा परिषद पुणे**

Zilla Parishad Pune ग्राम पंचायत पुणे जिल्हा परिषद